Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,
179, Near Balchitrawani, Behind
Agharkar Research Institute,
Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स..नं.८३२ए, फायनल प्लॉट नं.१७८,
१७९बालचित्रवाणीजवळ, आघारकर
रिसर्च इन्स्टिट्युटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर,
पुणे ४११ ००४.

Tel : Chairman(P):STD .(020)-25651751 Secretary(P):25651750&EPABX -25705000& Email : secretary.stateboard@gmail.com

तातडीचे
ईमेलद्वारे

क्र.रा.मं./टं.वि.परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती२३-२४/1366
पुणे ४११ ००४.
दिनांक – ०२ एप्रिल २०२४

प्रति,
विभागीय सचिव
सर्व विभागीय मंडळे.

विषय – सन २०२३-२४ मधील राज्यातील दुष्काळसदृश्य भागातील विद्यार्थ्यांची (इ.१०वी व इ.१२वी) परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती करणेसाठी Online द्वारे माहिती सादर करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ –
१. शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.३१/१०/२०२३
२. शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.१०/११/२०२३
३. शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.४७/एसडी-५, दि.१ ऑगस्ट, २०१९
४. शा. शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण २०१९/प्र.क.र.४७/एसडी-५, दि.०३/०२/२०२०
५. शा.नि.क्र,एफईडी १५९२/१००२/(११३२)/साशि-५, दि.१८/१०/१९९३
६. क्र.रा.मं./टं.वि.परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती/२३-२४/११३१, पुणे ४ दि.१३/३/२०२४
७. अखिल भारतीय उर्दु शिक्षक संघ, महाराष्ट्र यांचे पत्र.
८. क्र.रा.मं./टं.वि.परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती/२३-२४/१३०५, पुणे ४ दि.२६/३/२०२४
९. शाळांचे ईमेलद्वारे प्राप्त झालेले अर्ज दि.३०/३/२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, शासनाचे संदर्भीय क्र.१व २ च्या शासन निर्णयानुसार, टंचाईग्रस्त / दुष्काळग्रस्त भागातील इ.१०वी व इ.१२वी च्या विद्यार्थ्यांचे संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती ही राज्यमंडळ स्तरावरुन करण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य ४० तालुके व याव्यतिरिक्त १०२१ महसूल विभागातील बाधित क्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना 'माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२४' मधील परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थ्यांची यादी इ.१०वीसाठी `http://feerefund.mh-ssc.ac.in' आणि इ.१२वीसाठी 'http://feerefund.mh-hsc.ac.in' ह्या लिंकवर उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर लिंकवर दि.२८ मार्च, २०२४ पर्यंत माहिती सादर करण्याची दुस-यांदा मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि, काही शाळांनी पात्र विद्यार्थ्यांची माहिती / यादी अंतिम करण्यासाठी मुदतवाढ मागणी केली आहे.

मुदतवाढीच्या अनुषंगाने, ज्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी यापूर्वी माहिती सादर केली आहे, ~~तथापि~~ मुदत संपुष्टात आल्याने ज्या विद्यार्थ्यांची माहिती अप्राप्त असल्याने सादर केली नाही, अशा माहिती अप्राप्त असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती online द्वारे भरण्यासाठी, दि.३ एप्रिल, २०२४ ते दि.१२ एप्रिल, २०२४ या कालावधीमध्ये उपरोक्त link सुरु करण्यात येत आहे. याबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करण्यात यावे.

(अनुराधा ओक)
सचिव
राज्यमंडळ, पुणे

---

क्र. कोविमं/लेखा/प.शु.प./40
दिनांक : 03/04 /2024

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

सर्व माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, दुष्काळसदृश्य भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती करणेसाठी **online** द्वारे माहिती भरण्यासाठी **दि.03 एप्रिल, 2024 ते दि.12 एप्रिल, 2024 पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे** याची नोंद घ्यावी.

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.